सकाळ

# 'के. के. वाघ'च्या सहा विभागांना एनबीए मानांकन

■ सकाळ वृत्तसेवा

नाशिक, ता. १ : के. के. शिक्षण संस्था संचलित अभियांत्रिकी शिक्षण व संशोधन महाविद्यालयाच्या कॉम्प्युटर, इलेक्ट्रॉनिक्स ॲन्ड टेलिकम्युनिकेशन, सिव्हिल, इलेक्ट्रिकल, केमिकल व इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी या सहा विभागांना नॅशनल बोर्ड ऑफ एक्रेडीटेशन, नवी दिल्ली (एनबीए) तर्फे शैक्षणिक वर्ष २०२५-२६ ते २०२७-२८ या तीन वर्षाकरिता मानांकन प्राप्त झाले आहे.

महाविद्यालयाच्या सहा विभागांना नॅशनल बोर्ड ऑफ एक्रेडीटेशनकडून (एनबीए) मानांकन मिळण्याची ही चौथी फेरी आहे. २००३ पासून सातत्याने विविध विभागांना मानांकन प्राप्त होत आलेले आहे. सलग चौथ्या फेरीत एनबीए मानांकन मिळविणारे महाराष्ट्रातील मोजक्या अभियांत्रिकी महाविद्यालयात वाघ अभियांत्रिकीचा होतो. नॅशनल बोर्ड ऑफ एक्रेडीटेशनच्या १३ तज्ञ सदस्यांनी ४ ते ६ एप्रिलदरम्यान संस्थेला भेट दिली. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य व सहाही विभागाचे विभागप्रमुख यांनी समितीसमोर सादरीकरण केले. यापूर्वी महाविद्यालयाच्या मेकॅनिकल विभागास शैक्षणिक वर्ष २०२४-२५ ते २०२६-२७ पर्यंत व एमसीए विभागाला शैक्षणिक वर्ष २०२२-२३ ते २०२७-२५ पर्यंत मानांकन मिळालेले आहे. अशाप्रकारे एकूण ०७ पदवी व ०१ पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांना मानांकन मिळवणारे नाशिक विभागातील हे एकमेव महाविद्यालय आहे. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ, विश्वस्त अशोक मर्चंट, चांगदेवराव होळकर, जनसंपर्क संचालक अजिंक्य वाघ, सचिव प्रा. के. एस. बंदी व प्राचार्य डॉ. के. एन. नांदूरकर यांनी अभिनंदन केले.

## 'नॅक'तर्फे 'ए' श्रेणी

■ महाविद्यालयाला नॅक या राष्ट्रीय संस्थेतर्फे 'ए' श्रेणी आणि विद्यापीठ अनुदान आयोगाकडून शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून स्वायत्त महाविद्यालयाचा दर्जा मिळालेला आहे. महाविद्यालयाच्या या यशामुळे विद्यार्थ्यांसाठी रोजगार व उच्च शिक्षणाच्या संधी मोठया प्रमाणात उपलब्ध होईल. तसेच एन.बी. ए मानांकनाचा आंतरराष्ट्रीय स्तरावर कार्यरत असलेले माजी विद्यार्थी यांना होईल. त्याचप्रमाणे सध्या शिकत असलेल्या विद्यार्थ्यांनी जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन प्राचार्य डॉ. के. एन, नांदूरकर यांनी केले.